१३/८/९७ सकाळ

# दिल्लीतील स्पर्धेसाठी वैशाली शिंदेची निवड

कोल्हापूर, ता. १२ : येथील कमला महाविद्यालयातील छात्रसैनिक वैशाली विजयराव शिंदे हिची स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त दिल्लीत होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. छात्रसेनेच्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघातून तिची निवड झाली आहे. तिला प्राचार्य क्रांतिकुमार पाटील व लेफ्टनंट कर्नल शिरोई यांचे मार्गदर्शन लाभले.

